महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १५७ वा | दिनांक : २०/०३/२०२५ | वार : गुरूवार

## यूपीएससीच्या धर्तीवर एमपीएससीच्या भरती प्रक्रियेत देखील कॅलेंडर



**मुंबई :** यूपीएससीच्या धर्तीवर राज्यातील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या भरती प्रक्रियेत देखील कॅलेंडर निश्चित केले जाणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात दिली. एमपीएससीची परीक्षा या वर्षीपासून आपण डिस्क्रिप्टिव्ह स्वरूपात घेणार असल्याचे त्यांनी यावेळी जाहीर केले. यासाठी काही नागरिकांचा विरोध आहे. मात्र हा विरोध ग्राह्य धरणार नाही, अशा शब्दात मुख्यमंत्र्यांनी आपली भूमिका देखील स्पष्ट केली आहे. लवकरच एमपीएसच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात भरती करणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले.

एमपीएससी मध्ये मनुष्यबळ कमी असल्याने स्पर्धा परीक्षेची सर्व प्रक्रिया होऊन देखील उमेदवारांची पोस्टिंग होत नाही. याशिवाय पोस्टिंग देण्यासाठी काही व्यवहार होतात, असा आरोप आमदार विक्रम काळे यांनी सभागृहात केला होता. त्यावर देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर दिले आहे. अलीकडच्या काळात एमपीएससीमधील सर्वच पदे हे लवकर भरले गेले आहेत. सध्या तीन पदे रिक्त आहेत. ते आपण तात्काळ भरणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच भविष्यात एमपीएससी मार्फत मोठ्या प्रमाणात भरती प्रक्रिया सुरू करणार असल्याची माहिती त्यांनी सभागृहात दिली. परीक्षेचा निकाल लागला, तेव्हापासून आपण वेगाने काम केले असून यापुढे देखील वेगाने काम करणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सभागृहात सांगितले.

भविष्यात एमपीएससी मार्फत मोठी भरती करण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. यूपीएससी प्रमाणे एमपीएससी मध्ये देखील कॅलेंडर असेल, असे देखील मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले. या संदर्भात आमदार शिवाजीराव गर्जे यांनी विधिमंडळात प्रश्न उपस्थित केला होता. यावर मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले आहे.

एमपीएससी मंडळात ज्या जागा रिक्त आहेत, त्यापैकी एक जागा पूर्ण भरण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. तर उर्वरित दोन जागांची आपण जाहिरात देणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सभागृहात सांगितले. दरम्यान या संदर्भात अजित पवार यांनी दोन दिवसांपूर्वीच मुख्यमंत्री यांना पत्र दिले असल्याची माहिती देखील देण्यात आली. त्यामुळे आता एमपीएससीच्या माध्यमातून लवकरच मोठ्या प्रमाणात भरती होणार असल्याचे मुख्यमंत्री सभागृहात सांगितले आहे.

## दिशा सालियनच्या वडिलांची हायकोर्टात याचिका



दिशा सालियनच्या मृत्यूची स्वतंत्र, निष्पक्ष, पारदर्शक चौकशी करा अशी मागणी दिशाचे वडील सतीश सालियन यांनी याचिकेद्वारे केली आहे. त्यांनी मुंबई हायकोर्टात याचिका दाखल केली आहे. दिशावर सामूहिक बलात्कार करून तिचा खून करण्यात आल्याचा आरोप करतानाच या प्रकरणात आदित्य ठाकरेंची चौकशी करा, तसेच या प्रकरणाचा तपास सीबीआयकडे सोपवण्याची मागणी त्यांनी केली आहे. आदित्य ठाकरे, दिनो मोरियाचे कॉल रेकॉर्ड तपासा एकता कपूर, सचिन वाझेचे कॉल रेकॉर्ड तपासा अशी मागणी त्यांनी केली आहे.

आदित्य ठाकरे, दिनो मोरिया, सूरज पांचोली, एकता कपूर, सचिन वाझे, रिया चक्रवर्ती, इम्तियाज खत्री, शोविक चक्रवर्ती, आदित्यचे सुरक्षा रक्षक हिमांशू शिक्रे या सर्वांचे ३ ते २० ऑगस्ट २०२० चे कॉल रेकॉर्ड चेक करा टॉवर लोकेशनही तपासून घ्यावे अशी मागणीही सालियन यांनी याचिकेद्वारे केली आहे.

त्यांनी या याचिकेत किशोरी पेडणेकरांवरही गंभीर आरोप केले आहेत. पेडणेकरांनी सालियन कुटुंबावर दबाव टाकला. नितेश राणे, नारायण राणेंवर खोट्या आरोपांसाठी दबाव टाकला. किशोरी पेडणेकरांनी साक्षीदारांना जबाव न नोंदवण्यासाठी धमक्या दिल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

या प्रकरणाचा खटला महाराष्ट्राबाहेर चालवण्याची मागणी त्यांनी केली आहे. दिशा सालियनच्या पोस्ट मॉर्टेमचा व्हिडिओ कोर्टाला सादर करावेत दिशाच्या इमारतीचं ३ ते १० जूनचं सीसीटीव्ही फुटेज कोर्टाला द्यावं. सतीश सालियन यांची मुलाखत घेण्यापासून मीडियाला रोखावं. आतापर्यंत झालेली चौकशी बनावट असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

पोलिसांनी तपास करण्याएवजी प्रकरण दाबले. हा तपास म्हणजे काही शक्तिशाली लोकांना वाचवण्यासाठीचं नाटक होतं. ख-या आरोपींना वाचवण्याचा प्रयत्न केला गेला. आदित्य ठाकरेंना वाचवण्यासाठी खोट्या कहाण्या रचल्या गेल्या. मुंबई पोलिसांनी दिशाच्या आत्महत्येचा खोटा नरेटिव्ह सेट केला. जे पुरावे समोर आले त्यानुसार अमानुष सामूहिक बलात्कार, खून झाला. अमानुष सामूहिक बलात्कारानंतर हत्या करुन प्रकरण दडपण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा आरोप दिशाच्या वडिलांनी केली आहे.

## लेखक होण्यासाठी केवळ प्रशंसा नको : वाचन, एकाग्रता आणि सातत्य आवश्यक; विश्वास पाटील



**पुणे :** मोठ्या व्यक्ती, मोठे प्रसंग लेखकांना नेहमीच साद घालतात. वाचकांची दाद मिळविण्यासाठी उपलब्ध आहे त्यापलीकडे जाऊन लिहायचा प्रयत्न केला, तर तुमची प्रतिभा आणि प्रतिमा उठून दिसेल असे मत ज्येष्ठ साहित्यिक 'पानिपतकार' विश्वास पाटील यांनी व्यक्त केले.

'राष्ट्रीय पुस्तक न्यास', सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि समर्थ युवा फाउंडेशन यांच्या वतीने आयोजित केलेल्या 'होय, मी लेखक होणारच!' कार्यशाळेच्या समारोप कार्यक्रमात पाटील बोलत होते. न्यासाचे अध्यक्ष मिलिंद मराठे, विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. पराग काळकर, व्यवस्थापन समितीच्या सदस्या बागेश्री मंठाळकर, प्रसेनजीत फडणवीस, सागर वैद्य, प्राचार्य डॉ. संजय चाकणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पाटील म्हणाले, चांगला लेखक होण्यासाठी प्रचंड वाचन, एकाग्रता, सातत्य, संशोधन, झोकून देण्याची वृत्ती, अथक प्रयत्न, धैर्य, कौशल्य, सतर्कता हे गुण आवश्यक आहेत. तसेच आजूबाजूला शहाणी माणसे हवीत. कान धरणारे प्राध्यापक, पत्रकार, वाचक असावेत. केवळ प्रशंसा करणारे मित्र नसावेत.

मराठे म्हणाले, जे लेखन संपूर्ण मानव जातीच्या कल्याणाचा विचार करते ते साहित्य असे म्हटले जाते. साहित्य अक्षय असते. परंतु जे केवळ लिहिले जाते ते साहित्य नसून जे सातत्याने वाचले जाते ते खऱ्या अर्थाने साहित्य असते.

डॉ. काळकर म्हणाले, मनातील विचार शब्दांमध्ये व्यक्त करता आले पाहिजेत. या प्रक्रियेत शब्दांचा दर्जा, पोत, मांडणी महत्वाची असते. या प्रयत्नांची सातत्यपूर्ण पुनरावृत्ती केल्यास तुमच्यात हरवलेला लेखक मिळू शकेल. त्यासाठी खूप वाचन आणि अभ्यास आवश्यक आहे. कार्यशाळेत सहभागी विद्यार्थ्यांच्या लेखांच्या 'लेखकू जाहला' या पुस्तकाचे प्रकाशन पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २० मार्च २०२५


## राज्यातील जातीय तणाव पूर्वनियोजित - ॲड. प्रकाश आंबेडकर यांचा आरोप



**महेश मुंढे (देऊळगाव राजा) :** राज्यात सध्या वाढत असलेल्या जातीय तणावाच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी गंभीर आरोप केला आहे. “गेल्या काही आठवड्यांपासून महाराष्ट्रात सामाजिक सलोखा बिघडवण्याचे आणि जातीय तणाव निर्माण करण्याचे मोठे षडयंत्र रचले जात आहे. हे तणाव पूर्णपणे पूर्वनियोजित असून राजकीय फायद्यासाठी आणि जनतेचे लक्ष खऱ्या प्रश्नांवरून हटवण्यासाठी पद्धतशीरपणे रचले गेले आहेत,” असे त्यांनी स्पष्ट केले. आंबेडकर म्हणाले की, “निर्माण केलेली जातीय अशांतता ही भाजप-आरएसएसच्या अजेंडाला पोषक ठरत आहे.” त्यांनी यावेळी नागपूर हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाच्या भूमिकेवरही कठोर टीका केली.त्यांनी पुढे सांगितले की, “मुस्लिम प्रतिनिधींच्या शिष्टमंडळाने दोन वेळा मुख्यमंत्र्याची भेट घेऊन जातीय द्वेषाबाबत चिंता व्यक्त केली होती. अनेक मुस्लिम नागरिकांनी पोलिसांकडेही तक्रारी दाखल केल्या, परंतु प्रशासनाने कोणतीही ठोस कारवाई केली नाही.” “भाजपच्या नेतृत्वाखालील प्रशासन प्रक्षोभक भाषणे करणाऱ्यांवर, अफवा पसरवणाऱ्यांवर आणि जातीय अशांतता पसरवणाऱ्यांवर वेळेवर कारवाई करेल का?, हा मोठा प्रश्न आहे,” असे म्हणत त्यांनी राज्य सरकारवर निशाणा साधला.

## डॉ. संजय कसाब करिअर कट्टा उत्कृष्ट समन्वयक पुरस्काराने सन्मानित



**पूर्णा (जं.)** येथील स्वातंत्र्यसैनिक सूर्यभानजी पवार महाविद्यालयातील मराठी विभागाचे अभ्यासू प्राध्यापक, कवी डॉ. संजय कसाब यांना महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या अंतर्गत करिअर कट्टा या उपक्रमांतर्गत जिल्हास्तरीय उत्कृष्ट महाविद्यालयीन समन्वयक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.याविषयी अधिक माहिती अशी की, नांदेड येथील यशवंत महाविद्यालयाच्या शंकरराव चव्हाण सभागृहात महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या वतीने सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, माजी मंत्री डी.पी. सावंत, विभागीय सहसंचालक डॉ. किरणकुमार बोंदर, करियर कट्टयाचे राज्य समन्वयक डॉ. यशवंत शितोळे यांच्या हस्ते डॉ. कसाब यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्रा.डॉ.संजय यांचे विविध सामाजिक व सांस्कृतिक विषयावर लेखन प्रसिद्ध झालेले असून त्यांचे राष्ट्रीय , आंतरराष्ट्रीय परिषदा व चर्चासत्रांमध्ये चाळीसपेक्षा अधिक शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत . याशिवाय त्यांचे चार संपादित ग्रंथ असून ' स्वातंत्र्यसैनिक सूर्यभानजी पवार : जीवन व कार्य ' हे चरित्र त्यांनी लिहिलेले आहे. विविध वर्तमानपत्रे, नियतकालिके व आकाशवाणी वरून त्यांच्या कथा ,कविता व वैचारिक लेखन प्रकाशित आहे ." साठोत्तरी मराठी साहित्यातील आंबेडकरी विचारांचा प्रभाव : एक विवेचक अभ्यास " या विषयावर त्यांनी पीएच.डी. चे संशोधन पूर्ण केले आहे. तर " परभणी जिल्ह्यातील दलित लोकगीतांचा अभ्यास " हा युजीसी ,नवी दिल्ली येथे लघुशोध संशोधन प्रकल्प पूर्ण केला आहे .त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक सचिव तथा प्राचार्य डॉ. रामेश्वर पवार,अध्यक्ष गुलाबराव कदम, महाविद्यालयातील प्राध्यापक ,कर्मचारी व मित्र मंडळी यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे .महाविद्यालयात प्राचार्यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला यावेळी भारतातील सर्व प्राध्यापक कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते.

## श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयास छत्रपती संभाजीनगर विभागात उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार



**मुरुम : (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** महाराष्ट्र राज्य उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र आयोजित करिअर कट्टा अंतर्गत वर्षभरात केलेल्या सक्रिय उपक्रमाबद्दल धाराशिव जिल्ह्यातील प्रथम तसेच छत्रपती संभाजीनगर विभागात चार जिल्ह्यातून उमरगा येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयास उत्कृष्ट महाविद्यालय म्हणुन विशेष प्रमाणपत्र आणि स्मृती चिन्ह देऊन देवगिरी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ अशोक तेजनकर, करिअर कट्टा प्रमुख यशवंत शितोळे, प्राचार्य प्रवर्तक डॉ संजय खरात, पुणे, विभागीय समन्वयक प्राचार्य डॉ भारत खंदारे, प्राचार्य हरिदास विधाते यांच्या हस्ते प्राचार्य डॉ संजय अस्वले यांना सन्मानित केले.छत्रपती संभाजीनगर येथील देवगिरी महाविद्यालयातील रविन्द्रनाथ टागोर सभागृहात करिअर कट्टा विभागीय स्तरावरील बक्षीस वितरण सोहळा आणि NEP एकदिवसीय कार्यशाळा संपन्न झाली. यावेळी विभागीय समन्वयक डॉक्टर राजेश लहाने सह समन्वयक डॉक्टर कुरपुटवार जिल्हा समन्वयक पेरके मॅडम यांची उपस्थिती होतीकरिअर कट्टा अंतर्गत श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयास सेंटर ऑफ एक्सेलन्स A+ दर्जा मिळाला असून या अंतर्गत स्पर्धा परीक्षा केंद्र, इनकुबेशन सेंटर पोलिस अकॅडमी, IAS आपल्या भेटीला, उद्योजक आपल्या भेटीला, विद्यार्थी संसद, विविध कौशल्य विकास कोर्सेस आदी विद्यार्थी केंद्रित उपक्रम महाविद्यालयात राबविण्यात येत आहेत.

धाराशिव जिल्ह्यातील उत्कृष्ट महाविद्यालयीन समन्वयक म्हणून श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या डॉ अर्जुन कटके यांना सन्मानित करण्यात आले. तसेच विद्यार्थी संसदेच्या विद्यार्थ्यांनी केलेल्या डॉक्युमेंटरीला जिल्ह्यातून प्रथम पारितोषिक मिळाले.

याबद्दल सैफ इनामदार, प्रसाद मम्माळे, आणि प्रज्वल चालुक्य यांचाही स्मृतीचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.करिअर कट्टा च्या या यशाबद्दल भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अमोल शिवाजीराव मोरे, उपाध्यक्ष अश्लेष शिवाजीराव मोरे, सरचिटणीस जनार्धन साठे, सचिव पद्माकर राव हराळकर, सहसचिव डॉ. सुभाष वाघमोडे उप प्राचार्य डॉ. विलास इंगळे, उपप्राचार्य डॉ. पद्माकर पिठले, उपप्राचार्य जी. एस मोरे पर्यवेक्षक शैलेश महामुनी प्रबंधक राजकुमार सोनवणे कार्यालयीन अधीक्षक नितीन कोराळे आदींनी अभिनंदन केले आहे

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २० मार्च २०२५


## पाच दिवशीय पंचमी सोहळा उत्साहात संपन्न



**छत्रपती संभाजीनगर :** जिल्ह्यातील फुलंब्री तालुक्यातील खामगाव (नाथाचे) येथे धुलीवंदन पासून पाच दिवस पंचमी उत्सव मोठ्या पारपांरीक पध्दीने साजरा करण्यात येतो. दोनशे वर्षाची परंपरा असलेला हा उत्सव यंदा १४ मार्च शुक्रवार पासून सुरू झाला.पाच दिवसीय रंगपंचमी उत्सव भजनी मंडळाद्वारे पंचपदी गायनाने, गणपती, सरस्वती यांचे स्तवन करून उत्सवास सुरुवात होते. यामध्ये भाबर्डी, विदूषक या पात्राद्वारे मनोरंजनातून सामाजिक संदेश दिला जातो खामगावचे ग्रामदैवत श्री गोरक्षनाथ महाराजांचा जन्म दुष्टांत देखावा सादर करण्यात आला. महादेवाची स्वारी, टंट्या भिलाची स्वारी यावेळी काढण्यात आली. कुलस्वामिनी अंबादेवी, नृसिंह अवतार या देवतांचे आहावन केले जाते. यात १६मार्च रविवारी रात्री म्हणजेच पाहाटे चार वाजता अंबादेवीची स्वारी निघाली. अंबा भवानी कि जयच्या घोषणेने आणिस्वारीच्या भोवती पोतीच्या ज्योतीने वातावरण तेजोमय झाले. पाच दिवस चालणाऱ्या कार्यक्रमात स्थानिक कलावंतद्वारे सामाजिक प्रबोधन, दारूबंदी, स्त्रीभ्रूरूण हत्या हंडा बंदीसह सामाजिक ऐक्याची संदेश देणाऱ्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. जिल्हाभरातुन हजारो भाविकांची या सोहळ्यास उपस्थिती होती.

## वेरूळ लेणी : पर्यटकांवर आग्या मोहोळाचा हल्ला



**खुलताबाद : (प्रा. योगेश रावते)** जगप्रसिद्ध वेरूळ लेणी येथे सोमवारी दुपारी १ वाजेच्या दरम्यान पर्यटनासाठी आलेल्या पर्यटकांवर आग्या मोहोळाने अचानक हल्ला केल्याची घटना घडली. यात शंभरच्या आसपास पर्यटक जखमी झाले. त्यातील इंग्लंड येथील एक पर्यटक गंभीर जखमी झाले.जखमींना घाटी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. यामुळे वेरूळ लेणी परिसरात गोंधळ उडाला होता दरम्यान तिकीट विक्री बंद करण्यात आली. अलीकडच्या काळात उन्हामुळे हल्ल्याच्या घटना वाढत आहेत उन्हाळ्याच्या दिवसात अजिंठा वेरूळ लेणीसह पर्यटन ठिकाणी हल्ल्याच्या घटनाची वाढ होते. सोमवारी दुपारी १६ क्रमांकाचे 'कैलास लेणे' या ठिकाणी पर्यटक पाहणी करत असताना अचानक आग्या मोहोळ उठले माशांचा आवाज बघून पर्यटकांमध्ये गोंधळ उडाला यावेळी मोहळाने पर्यटकांवर हल्ला केला यामुळे पर्यटकांमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले.

## जि.प. शिक्षकांच्या विविध प्रलंबित प्रश्नासंदर्भात शिक्षक समितीचा आंदोलनाचा इशारा



**कन्नड (अरुण थोरात):** राज्य शासन स्तरावर व जि.प स्तरावर शिक्षकांचे विविध विषय प्रलंबित आहेत. त्या प्रश्नांची प्रशासनी दखल घेऊन प्रश्न तात्काळ सोडवावीत अन्यथा शिक्षक समिती जि प कार्यालया समोर दि.०१ एप्रिल रोजी धरणे आंदोलन करण्यात येईल असा इशारा शिक्षक समितीने निवेदना द्वारे विभागीय आयुक्त, जिल्हा अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी यांना दिला आहे. या निवेदनात दि.१५ मार्च २०२४ संच मान्यतेचा शासन निर्णय रद्द करण्यात यावा,सन २०२५ मध्ये होणाऱ्या बदल्यामध्ये सन २०१८ मध्ये ज्या शाळा दुर्गम क्षेत्रात होत्या, परंतु त्या शाळा सन २०२२ मध्ये सुगम क्षेत्रात आल्यामुळे तेथील शिक्षकांना दुर्गम क्षेत्रात काम करूनही त्यांच्या बदल्या अद्याप पर्यत न झाल्यामुळे अशा शिक्षकांना होणाऱ्या बदल्यामध्ये बदली संवर्ग क्र ३ मध्ये समाविष्ट करून त्यांच्या वर होणारा अन्याय दुर करावा, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची अमलबजावणी पुढील शैक्षणीक वर्षापासुन होणार असल्यामुळे स्कॉप चे मुल्यमापन पुढील शैक्षणीक वर्षापासून राबविण्यात यावे,वरिष्ठ वेतनश्रेणीस( निवड श्रेणी ) पात्र शिक्षकांना तात्काळ वरिष्ठ वेतनश्रेणीचा ( निवड श्रेणीच ) लाभ देण्यात यावा, सन २०२२ मध्ये दुर्गम क्षेत्रातील शाळांची निवडयादी उशीरा प्रकाशीत झाल्यामुळे सन २०२२ च्या दुर्गम क्षेत्रात काम करत असलेल्या शिक्षकांना दुर्गम क्षेत्रात काम करण्याचा लाभ होत नसल्यामुळे सन २०२२ मध्ये दुर्गम क्षेत्रात असलेल्या सर्व शिक्षकांना येणाऱ्या बदल्या मध्ये बदली संवर्ग क्र ३ मध्ये टाकून त्यावर होणारा अन्याय दुर करावा, न्यायालयीन बदली प्रकरणे बदली पूर्वी निकाली काढण्यात यावी, रमजान ईद सणा पुर्वी सर्व शिक्षकांचे मार्च २०२५ चे वेतन अदा करण्यात यावे, जे पदवीधर शिक्षक स्वेच्छेने पदवीधर ग्रेड परत करण्यास तयार आहेत अशा शिक्षकांचे रिव्हर्शन करण्यात यावे. तसेच ज्या पदवीधर शिक्षकांनी बीएससी पूर्ण केले आहे त्यांना बदली करताना गणित/विज्ञान च्या जागी बदली करण्याची संधी मिळावी जेणेकरून गणित विज्ञानच्या जागा ही भरल्या जातील आणि सामाजिक शास्त्र चे शिक्षक पण अतिरिक्त होणार नाहीत, शालेय पोषण आहार चा black date entry data उपलब्ध करून देण्यात यावा.या सर्व विषयांचा योग्य तो विचार करून न्याय दयावा, न्याय न दिल्यास नाईलाजस्त शिक्षक समितीच्या जि प कार्यालया समोर न्याय हक्क मागण्या साठी दि.०१ एप्रिल २०२४ रोजी धरणे आंदोलन करावे लागेल असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. निवेदनावर जिल्हा अध्यक्ष विजय साळकर, जिल्हा सरचिटणीस रंजित राठोड, नितीन नवले, शामभाऊ राजपुत, विष्णु भंडारे, प्रसिध्दी प्रमुख सतीश कोळी, कडुबा साळवे , काकासाहेब मगर, दिलीप रासणे, अशोक डोळस, कैलास ढेपले, बबन चव्हाण, भाऊसाहेब बोर्डे, चंदु लोखंडे, जावेद अन्सारी, मुन्सी शहनाज, प्रविण गायकवाड, दत्ता खाडे, रमेश पांचाळ, गजानन वरकड, पंजाबराव देशमुख, संतोष भाबड , संतोष जाधव, प्रकाश जाधव, भिमराव पंडीत, दत्तात्र्य थोरात, अर्चना पार्थीकर, शितल भडागे, जयश्री राठोड, संगीता मते, मंगला मदने, प्रिती जाधव, वर्षा राठोड अर्चना गोर्डे, दिपीका एरंडे, सुनिता चितळकर, विलास चव्हाण, विजय पवार, रामनाथ शेळके, रामेश्वर रोडे आदी सह शेकडो पदाधिकाऱ्याच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## 'सत्ताधारी पक्षाला पाशवी बहुमताचा माज' -अंबादास दानवे

**मुंबई :** महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे हे सभागृहाचे कामकाज करताना पक्षपाती व एकांगीपणे कामकाज चालवत आहेत. सभागृहाचे कामकाज नियमानुसार होत नाही. विरोधी पक्ष व विरोधी पक्षनेते यांचे हक्क डावलले जात असल्याने त्यांनी सभागृहाचा विश्वास गमावला आहे, त्यामुळे त्यांच्यावर महाविकास आघाडीच्या आमदारांनी अविश्वास ठराव मांडत त्यांना पदावरून दूर करण्याची मागणी विरोधी पक्षाने केली आहे. महाविकास आघाडीने उपसभापती नीलम गोऱ्हे यांच्याविरोधात ५ मार्चला नियमाप्रामाणे प्रस्ताव दिला होता. मात्र सभापतींनी मंगळवारी तो फेटाळला. आज कार्यक्रमात नसताना भाजपचे गटनेते प्रवीण दरेकर यांनी उपसभापतींवर विश्वास प्रस्ताव ठेवला. तसेच विरोधी पक्षनेत्याला आपली भूमिका मांडू दिली नाही. त्यामुळे आज महाविकास आघाडीच्या आमदारांनी सभात्याग केला. तसेच याचा निषेध म्हणून उद्या काळ्या फिती लावून कामकाजात सहभागी होणार आहे. तसेच उपसभापती डायसवर बसल्यास कामकाजात सहभागी होणार नसल्याची माहिती दानवे यांनी दिली.

एकप्रकारे सत्ताधारी पक्षाला पाशवी बहुमताचा माज चढला आहे. त्यांनी विरोधकांची भूमिका मांडू न देता रेटून प्रस्ताव नेला, त्याला आम्ही विरोध केला. त्यावर आम्ही अर्धा तास घोषणा दिल्या. विरोधी पक्षाला बोलू न देणे हे लोकशाहीला बाधक आहे. लोकशाहीच्या संस्कृती व परंपरेला छेद देणार असल्याचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी म्हटले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २० मार्च २०२५


## औरंग्याच्या कबरीचे काय करायचे ? - श्रीकांत देशमुख



एका गहन इतिहासात सध्या महाराष्ट्र बुडाला आहे. औरंग्याच्या कबरीचे काय करायचे ? छत्रपतींचे स्वराज्य काबीज करता आले नाही, ही भयंकर अस्वस्थता आजही या कबरीच्या तळाशी असेल. कबर खोदून फेकली तरी ती दिसेल. मुळात हाच स्वराज्याचा विजय होता, तो उखडून फेकायचा का ? त्या कबरीवरले अशांत आकाश तेही उखडून फेकायचे का ? आयुष्यात ज्या बादशहाला सगळे काही करता आले, जन्मदात्यांना जेल, भावाचे हत्याकांड, जिझिया कर सगळे काही, पण राजांना आणि शंभुना नाही नमवता आले. त्या जालीम पराभवाचे ही कबर हे एक प्रतीक आहे, ज्याला पाहून आपल्याला आठवतो तो शिवप्रभूंचा, शंभू राजांचा विश्वव्यापी जाणता इतिहास, तो उखडून फेकायचा का ? तसे तर सुमार हिंदुत्ववादी प्रेरणांच्या आड येणारे अजून बरेच काही आहे, इथल्या चर्च, ताजमहाल, ब्रिटिश डच पोर्तुगीजांनी बांधलेल्या इमारती, लाल किल्ला, फत्तेपुर शिक्री, बीबीका मकबरा, पाणचक्की, अनेक शहरांचे मुगलकालीन तट-दरवाजे सारेच उखडून फेकावे लागेल. मोगल ब्रिटीश फ्रेंच सगळेच आक्रमक-त्यांनी जे जे उभारले होते ते ते सारेच. 'तथाकथित नवा इतिहास' घडवण्यासाठी सगळाच विध्वंस करावा लागेल. हा इतिहासकालीन मलबा देखील समुद्रात नेऊन बुडवावा लागेल. समोर काहीच नको.मनुस्मृतीला उखडता येईल का ? इथल्या तथाकथित आध्यत्मिक संतांच्या पोटभरू शिकवणीला उखडता येईल का ? इथल्या स्त्री शूद्रांच्या दास्याला कायमचे कायमचे हद्दपार करता येईल का ? या सगळ्यांनी निर्माण केलेला अमानुष इतिहास उखडून फेकता येईल का ? त्यासाठी माणसे अशी नाहीत येत रस्त्यावर. जे औरंग्याची कबर उखडण्याची भाषा करत आहेत, त्यांना हे का करावेशे वाटत नाही ? नेमकी हीच भाषा, नेमक्या याच काळात-वेळेला का आणि कश्यासाठी ? "छावा" प्रदर्शित झाला आणि एकाएकी इथल्या तथाकथित स्वाभिमानी, धर्माभिमानी लोकांना आपला इतिहास आठवला. त्यापूर्वी, नंतर आणि आज काय घडत आहे हे ते विसरून गेले. ते संपूर्ण वर्तमान विसरून गेले. ते इतिहासाची पाने नासवणाऱ्या हिंदूंना विसरून गेले. ते इथल्या उदारमतवादी, प्रबोधन परंपरेला विसरून गेले. छत्रपती शिवाजी राजांच्या इतिहासाबद्दल ज्यांना कथित पराकोटीचा अभिमान आहे, त्यांना वर्तमानाची ट्युशन नाहीय लावायची. इतिहासात हिंदू, मुस्लिम, इसाई अनेक धर्मातले शेकडो खलनायक आहेत. ज्यांनी त्या त्या काळात नायकांचा तात्कालिक पराभव केलेला असेल. तरी इतिहास ओळखला जातो तो नायकांचा, खलनायकांचा नाही. काळ कधी थांबत नाही, त्याची आपली एक गती असते. बराच काळ उलटल्यानंतर बरेच काही आठवणे आणि जे आठवले त्याची निर्भत्सना करणे, हे अतिशय स्वाभाविक असले तरी त्याचा कार्यकारणभाव नेमका काय आहे, हेही समजून घ्यायला हवे. कबरी उखडून फेकल्या तरी इतिहास बदलत नसतो. केवळ एक अराजक निर्माण होते. जे नेमके काही समूहांना अपेक्षित असते. त्यांना छत्रपती किंवा औरंगजेब कोणाबद्दल काहीही ठाऊक नसते. त्यांना फक्त हैदोस घालायचा असतो. असे लोक वृत्तीने औरंगजेबाच्याच सैन्यातले असतात, सगळं काही उध्वस्त करणारे. सगळीकडे एक धुके पसरलेय. गांधी नको, पंडित जवाहरलाल नकोत, महत्तम महात्मा फुले नकोयत, रानडे-लोकहितवादी-गोखले नकोयत, गाडगेबाबा नकोयत, बाबासाहेब नकोयत, बरेच काही नकोय. काय हवंय यांना नेमके ? त्यांना हवीय प्रचंड दुभंगलेली माणसे, मनाने खचलेली, आपले स्वत्व गमावून बसलेली. त्यांना हवाय पेटलेल्या घरादारांचा धूर, भर रस्त्यावर ओरडत फिरणारी बाया माणसे. त्यांना हवाय एक सनातन काळ, त्रिखंडी काळ. जो माणसांना आणि त्यांच्या मनांना जाळून निघतो. त्यांना हवाय एक कोळसा झालेला समाज, जो फक्त जळत राहील , काहीच बोलणार नाही. म्हणजे अबाधितपणे राज्य करता येईल. कुठलेच सकारात्मक परिवर्तन त्यांना नकोय. कोरटकर काय म्हणाला-महाराज पळून गेले, कोषारी असेच काही, पुरंदरेनी अवघा विकृत इतिहास लिहिला, भिडे काय बोलतो, तेव्हा कोणीच कसे नाही बोलले या महाप्रचंड टोळीतले ? शिवाजी महाराजांनी कुठल्या धर्माचा द्वेष केला ? औरंगजेबाला लिहिलेल्या पत्रात राजे लिहितात, कुराण तो अस्मानीचा ग्रंथ. शिवाजीच्या नावाने राजकारण करणारे कुठल्या शिवाजी महाराजांबद्दल बोलताहेत ? त्यांचा शिवाजीराजा वेगळा आहे का ? प्रत्येकाचा शिवाजी कसा वेगळा असेल ? ते तर छत्रपतींचेही तुकडे करताहेत. छत्रपती एकच असतात, रयतेच्या भाजीच्या देठासही हात लावू नये, असं सांगणारे. रयतेला पेटवणारे, जाळणारे कोण आहेत हे 'जय शिवाजी' म्हणणारे ? कुठून आल्यायत या टोळधाडी ? यांना कोणी दिलाय अधिकार माणसांना जाळण्याचा, विकृत रक्तरंजित वर्तमान लिहिण्याचा ? खूप भयंकर लोक आहेत हे. माणसे नाहीत ती. त्यांनी संपूर्ण देशाला नरकात बुडवायला सुरवात केलीय, तीही छत्रपतींच्या नावाने. बेरोजगारी, शेतकरी आत्महत्या, दलित आदिवासी, महिला अत्याचार यावर कोणीच बोलत नाही. एक सिनीमा पाहतात आणि मग छत्रपतींच्या वांशिक वारसदारांना देखील औरंग्याची कबर उखडून फेकावी वाटते. कोणी विद्यमान पं प्र ना शिवाजीचा अवतार म्हणतो. कोणी राजांचे मंदिर बांधतो, कोणी त्यांची आरती म्हणतो. राजांना एकदा मंदिरात बसवले की मग आपण मोकळे समाज जाळायला. एका भयंकर काळात आपण प्रवेश केलाय. हे फक्त औरंगजेबच्या कब्रिजवळ थांबणारे नाही. उद्या महात्मा गांधींच्या समाधीचा नंबर लागेल, ज्यांनी ज्यांनी नवा विचार दिला त्यांचा नंबर लागेल. ग्रंथालये जाळून टाकल्या जातील, हिटलरने जाळली होती तशी. समग्र फुले साहित्याची होळी केली जाईल, बाबासाहेबही सुटणार नाही. कुठल्याही अविचारांचा प्रवास असाच असतो. त्याला वाव दिला की जे आड येत असेल ते सगळेच जाळल्या जाते. समाजाचे पूर्ण तालिबाणीकरण केल्या जाते.वर्तमान घडवता येत नसेल तर किमान बिघडवू नका, असा किमान विचार करणाऱ्या माणसांना आव्हान देणारा हा काळ, एका भयंकर प्रवासाला निघाला आहे ! शिवाजी महाराजांना खऱ्या अर्थाने समजून घ्या आणि कामाला लागा. फार काही करावे नाही लागणार. वर्तमान औरंगजेबी आपोआप पळून जातील.

## औरंगजेबाचा मुद्दा सध्या संयुक्तिक नाही : नागपूर दंगलीवर आरएसएस ची पहिली प्रतिक्रिया



**मुंबई** : नागपूर दंगलीवर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची पहिली प्रतिक्रिया आली आहे. औरंगजेबाचा मुद्दा सध्या संयुक्तिक नाही. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ कुठल्याही प्रकारच्या हिंसाचाराचे समर्थन करत नाही, अशा स्पष्ट शब्दात आरएसएसने आपली भूमिका जाहीर केली. सोबतच औरंगजेबाची कबर पाडण्याच्या मागणीवरून सुरू असलेल्या वादापासून स्वतःला दूर केले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर यांनी बुधवारी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी नागपूरमधील हिंसाचाराचा निषेध केला. तसेच कोणत्याही प्रकारचा हिंसाचार समाजाच्या आरोग्यासाठी हानिकारक असल्याचे म्हटले.

संभाजीनगर येथील औरंगजेबाची कबर हटवण्याची विहिंप आणि इतर संघटनांची मागणी आहे. यावर सुनील आंबेकर म्हणाले की, मुघल सम्राट आजच्या काळात संयुक्तिक विषय नाही. कोणत्याही प्रकारच्या हिंसाचाराला प्रोत्साहन दिले जाणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. औरंगजेबाची कबर हटवण्याच्या मागणीवरून आणि त्याच्याशी संबंधित विविध अफवांवरून नागपुरात हिंसाचार उफाळल्यानंतर तणाव वाढला असताना आरएसएसची ही भूमिका समोर आली आहे. १७ मार्च रोजी झालेल्या हिंसक संघर्षानंतर पन्नास जणांना ताब्यात घेण्यात आले आहे. यात नागपूरमधील दहा पोलिस क्षेत्रात सलग दुसऱ्या दिवशीही संचारबंदी लागू आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची २१, २२ आणि २३ मार्च रोजी जनसेवा विद्या केंद्र परिसरात वार्षिक एबीपीएस, जी वर्षातील सर्वात महत्त्वाची बैठक आहे. सुनील आंबेकर यांनी माहिती दिली की, एबीपीएसच्या सुरुवातीला सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे संघाच्या कार्याच्या स्थितीचा अहवाल सादर करतील आणि त्यानंतर विविध प्रांतांच्या कार्यकर्त्यांकडून देशभरातील उपक्रम आणि कार्यक्रमांचा अहवाल सादर केला जाईल.

अखिल भारतीय प्रतिनिधी सभेचा उद्घाटन समारंभ २१ मार्च २०२५ रोजी सकाळी ९.०० वाजता जनसेवा विद्या केंद्र, चन्नेनहल्ली येथे होणार आहे. आरएसएस सरसंघचालक डॉ. मोहन भागवत आणि सरकार्यवाहक दत्तात्रेय होसाबळे संयुक्तपणे अखिल भारतीय प्रतिनिधी सभेचे उद्घाटन करतील.

आंबेकर म्हणाले की, या वर्षी आरएसएस १०० वर्षांचे होत असल्याने, अखिल भारतीय प्रतिनिधी सभेदरम्यान संघाच्या कार्याचा विस्तार करण्यावर विचारविनिमय केला जाईल. विजयादशमी २०२५ ते विजयादशमी २०२६ हे शताब्दी वर्ष म्हणून साजरे केले जाईल. व्यापक प्रचाराचे नियोजन केले जाईल आणि या प्रचारात सर्व स्तरातील लोकांना सहभागी करून घेतले जाईल. पंच परिवर्तन (सामाजिक सौहार्द, कुटुंब प्रबोधन, पर्यावरण जागरूकता, 'स्व' (स्वार्थ) आणि नागरिकांची कर्तव्ये यांचा आग्रह) यावर देखील चर्चा केली जाईल आणि शताब्दी वर्षात सर्व स्तरातील लोकांना सहभागी करून घेण्याची योजना आखली जाईल.

नागपूर हिंसाचाराच्या घटनेवर उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे नेते आदित्य ठाकरे म्हणाले की, नागपूरमध्ये मुख्यमंत्र्यांसोबत असलेला गृहविभाग अपयशी ठरला आहे. दुःखद गोष्ट म्हणजे कायदा आणि सुव्यवस्था पोलिसांच्या हातात नाही. जर कायदा आणि सुव्यवस्था पोलिसांच्या हातात असती, तर गेल्या 2-3 वर्षांपासून तुम्ही जे पाहत आहात, असंख्य बलात्कार इत्यादी गोष्टी घडल्या नसत्या. सध्या गृहखाते हे मुख्यमंत्र्यांकडे आहे. तो विभाग अपयशी ठरल्याचा आरोपही त्यांनी केला.